**सी.एन.आय. क्र : एम.एच.एल.सी. ३६०००३१६२०२२**

**<u>प्रल्हाद बेहेरा व इतर ... विरुध्द ... द. ओरिएंटल इंन्सुरन्स कंपणी लिमी. व इतर</u>**

**<u>निशाणी क्र. यु.–२७ वरील आदेश</u>**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज हा मृतकाच्या नावात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे.

२. अर्जदारांच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

अर्जदारांनी प्रस्तुतचा मुळ अर्ज श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ चे कलम २२ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. परंतु मुळ अर्ज अर्जदाराच्या उलट तपासाकरीता प्रलंबित असतांना मृतकाचे नाव पिंटू ऐवजी पंकज लिहल्याचे लक्षात आहे. म्हणुन त्यांनी त्या अनुषंगाने मुळ अर्जात मृतकाच्या नावात सुधारणा करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सदरील अर्जावर गैरअर्जदाराचे म्हणणे मागविण्यात आले. गैरअर्जदार यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे.

४. वर नमुद दोन्ही विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाच्या व म्हणण्याच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, मुळ अर्ज श्रमिक नुकसान भरपाई अधिनियम, १९२३ चे कलम २२ अंतर्गत नुकसान भरपाई मिळण्याकरीता दाखल केला आहे. परंतु मुळ अर्ज अर्जदाराच्या उलट तपासाकरीता प्रलंबित असतांना मृतकाचे नाव पिंटू ऐवजी पंकज लिहल्याचे लक्षात आल्यामुळे मुळ अर्जात त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व त्याबाबतचा अर्जदाराने मृतकाचे आधार कार्ड अभिलेखावर दाखल केले आहे. तसेच त्यांनी मागितलेली मागणी विचारात घेता ते करु इच्छीत असलेल्या मागणीमुळे मुळ

LABOUR COURT

अर्जाच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी करु इच्छीत असलेली दुरुस्ती त्यांनी आदेश झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी व दुरुस्तीची प्रत अभिलेखावर दाखल करुन ती गैरअर्जदाराना देखील पुरवावी.

भंडारा. (एफ.के. शेख)

दिनांक : ०२.०५.२०२५. न्यायाधीश

कामगार न्यायालय, भंडारा

LABOUR COURT